# प्रेसनोट

जा.क्र. ६७८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २९/०९/२०१७

## " खुनाचे गुन्हयात आरोपीस आजन्म कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा"

**भंडारा**:— भंडारा जिल्हयातील पोलीस स्टेशन पवनी अंतर्गत ग्राम ब्रम्ही ता.पवनी जि. भंडारा येथील तक्रारदार सौ. जयश्री राजेश देशमुख यांनी दि. ०२/०५/२०१५ पोलीस स्टेशन पवनी येथे तोंडी तक्रार दिली की, तक्रारदार ही पती राजेश देवचंद देशमुख यांचे सह राहत असुन फिर्यादीचे पती ग्रामपंचायत ब्रम्ही येथे पाणी पुरवठा कर्मचारी म्हणुन काम करतात त्यांना ०८ वर्षाचा मुलगा व एक ०६ वर्षाची मुलगी आहे. मुलगी अडीच वर्षाची असतांना वारंवार आजारी पडत असल्याने गावातील देवीदास तुळशिराम मानकर यांचे कडे २ ते ३ वेळा उपचार केला , परंतु आजार बरा न झाल्याने फिर्यादीचे पतीने देवीदास मानकर यास वारंवार उपचार करुनही आजार बरा न होत असल्याने, व त्यावरुन हटकल्याने देवीदास मानकर व पती राजेश देशमुख यांचे मध्ये भांडण झाले, त्यानंतर फिर्यादीचे मुलीस नागपुर येथील दवाखाण्यात नेले व उपचार करुन घरी परत आणले पती राजेश देशमुख व देवीदास मानकर यांचेमध्ये वाद झाले, वादात देवीदास मानकर मानकर यांने फिर्यादीचे पतीला जिवानीशी ठार मारण्याची धमकी दिली.

दिनांक ०२/०५/२०१५ रोजी सायंकाळी ०५.३० वाजता फिर्यादी, फिर्यादीचे पती व पतीची बहीण नवेगाव ठाणा येथुन बाजार घेवुन घरी परत आले, व गावात पाणी सोडण्याकरीता गेला असता गावातील विठ्ठल रुक्माई मंदीरासमोर देवीदास मानकर याने त्याचे जवळील कुऱ्हाडीने राजेश देशमुख यांचे डोक्यात घाव करुन गंभिर जखमी केले. त्यामुळे फिर्यादीचे पती जागेवरच मरण पावले, अश्या तक्रारी वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे अप क्र. ७१/२०१५ कलम ३०२ भांदवि अन्वये गुन्हा नोंद केला,

सदर गुन्याची तपास मधुकर गिते व पथक यांनी सुरु केला व गुन्हयात **आरोपी नामे देवीदास तुळशिराम मानकर वय ५० वर्ष, रा. ब्रम्ही** यास अटक केली. व तपास पुर्ण करुन आरोपी विरुध्द जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा येथे दोषारोपपत्र दाखल केले.

सदर गुन्हयाची सुनावणी मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश क्र. २ भंडारा यांचे समक्ष चालली . गुन्हयात सरकारी पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. प्रमोद के. भुजाडे यांनी योग्य बाजु मांडली. आज दिनांक २९.०९.२०१७ रोजी गुन्हयात आरोपी नामे देवीदास तुळशीराम मानकर यास भांदवि कलम ३०२ अन्वये दोषी ठरवुन **आजन्म कारावास व ३,०००/—रुपये दंड, दंड न भरल्यास ५ महिणे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली**. सदर गुन्हयात पोलीस नाईक चंद्रशेखर पटले पोस्टे पवनी यांनी पैरवी अधीकारी म्हणुन कामकाज केले. सरकारी अभियोक्ता श्री. प्रमोद के. भुजाडे यांनी गुन्हयात कुशलतेने पुरावे सादर केले. व साक्षदार हाताळले.

**(कृपया समोरच्या पहील्या पानावर देण्यास विनंती)**

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता